# आपत्ती व्यवस्थापन विभाग

## 2022-23

६० (अ) विनिर्दिष्ट माहिती

## कलम ६० - अ (१)

मिरा-भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील.

कार्यालयाचे नांव -: आपत्ती व्यवस्थापन विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका

पत्ता -: मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व, इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), जि. ठाणे - ४०१ १०१

- कार्यालय प्रमुख-: आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प), जि. ठाणे
- शासकीय विभागाचे नांव :- आपत्ती व्यवस्थापन विभाग
- कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या अधिनस्त :- नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
- कार्यक्षेत्र :- मिरा-भाईदर शहर भौगोलिक :- 79 चौ.कि.मी.
- कार्यानुरूप :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे.

**विशिष्ट कार्य :-** संभाव्य आपत्ती व व्यवस्थापन

१) **अतिवृष्टी व पूर परिस्थिती :-** जून ते सप्टेंबर या काळात शहरांमध्ये सरासरी २४०० मिली मिटर पाऊस पडतो. जून ते सप्टेंबर या काळात मूसळधार पाऊस व मोठी समुद्र भरती एकत्र आल्यास या शहरातील खोलगट भागास पूराचा धोका अधिकच वाढतो. पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक असणारा storm water drainage नसल्याने पाणी निचरा होण्यास जास्त वेळ लागतो.

२) **पाणी तुंबणे :-** महानगरपालिका हद्दीत एकूण १५५ कच्चे व पक्के नाले आहेत. भौगोलिक परिस्थितीमुळे काही सखल भागामध्ये जास्त पाऊस न पडूनही नाले भरतात. त्यामुळे झोपडपट्टया किंवा जुन्या वस्त्यांमध्ये पावसाळयाचे पाणी तुंबण्याची शक्यता असते. महानगरपालिका क्षेत्रात अशी एकूण पाणी तुंबण्याचे ३० ठिकाणे आहेत. सदर सखल भागामध्ये पाणी तुंबल्यानंतर मनपा द्वारे विविध क्षमतेच्या सक्शन पंपाद्वारे पाण्याचा उपसा करुन निचरा करण्यात येतो. या सोबत महानगरपालिकेकडून पावसाळयापुर्वी नाले सफाई केली जाते.

३) **धोकादायक इमारती :-** मिरा भाईंदर क्षेत्रात एकूण १५ अति धोकादायक इमारती आहेत. अशा धोकादायक इमारतीमधील रहिवाशांना इमारत रिकामी करण्याची नोटीस (वास्तव्य न करण्याबाबत) देऊन, रहिवाशांना स्थलांतरीत इमारत रिकामी करणे व अशा इमारती पाडण्याची कार्यवाही शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून होत असते. दुर्दैवाने एखादी धोकादायक इमारत कोसळल्यास, अग्निशमन विभागाच्या मदतीने इमारतील रहिवाशांना बाहेर काढून मनपाच्या शाळांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

४) **झाडे कोसळणे :-** मुसळधार पाऊस व चक्री वादळ, सोसाटयाचा वारा यामुळे झाडे व झाडांच्या फांदया तुटण्याचे प्रकार मोठया प्रमाणात घडतात. सदर झाडे व फांदया घरांवर अथवा रस्त्यांवर पडून वित्तहानी व जीवहानी होते. सदर प्रकार टाळण्यासाठी वन विभागामार्फत पावसाळयापुर्वी रस्त्यालगतच्या झाडांची पाहणी करून, धोकायदाक झाडांची व फादयांची छाटणी करण्यात येते. तसेच झाडे अथवा फांदया मोडून पडल्यास वन विभाग व अग्निशमन विभागामार्फत ते हलवण्याची कारवाई केली जाते.

५) <u>विज पडणे व विजेचा धक्का लागणे :-</u> मोसमी पावसाळी हंगामात अतिवृष्टी बरोबरच वादळी वारे अशा दोन्ही प्रकारच्या नैसगिर्क आपत्तीमुळे विजेचे खांब कोसळणे, इत्यादी बाबी घडत असतात व अशा वेळी विद्युत प्रवाह सुरू असताना रस्त्यावर किंवा पाण्यामध्ये पडलेल्या खाबांमुळे विद्युत धक्का बसून, अपघात होण्याची शक्यता असते. अशावेळी आवश्यकतेनुसार विद्युतप्रवाह खंडीत करणे, जिवीत हानी टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक असते. तसेच पुन्हा सुरळीतरित्या विद्युत यंत्रणा कार्यान्वित करणे हेही आवश्यक असते. सदरच्या सर्व बाबींवर उप-अभियंता (विद्युत) हे नियंत्रण ठेवतात तसेच याबाबत रिलायन्स एनर्जी या कंपनीस वेळोवेळी सुचना / निदेर्श देण्यात आलेले आहेत.

६) <u>रोगराई :-</u> पावसाळयात मोठा पूर येऊन गेल्यावर, इतरत्र कचरा फैलावत असतो. माश्याचा प्रादुर्भाव वाढतो, तसेच पावसाळ्यामध्ये दुषित पाण्यामुळे होणारे अतिसार, गॅस्ट्रो, पटकी, विषमज्वर यासारखे साथीचे रोग उद्भवण्याची शक्यता असते. मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात पावसाळयात रोगराई पसरू नये, याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत साचलेल्या कचऱ्यांच्या ढिगांवर जंतूनाशकांची फवारणी करण्यात येते. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आवश्यक औषधसाठा उपलब्ध करण्यात आलेला आहे. याशिवाय पाणीपुरवठा विभागातर्फे नागरिकांना जाहिर आवाहन देखील करण्यात येते.

७) <u>त्सुनामी :-</u> मिरा भाईंदर मधील उत्तन व खाडी किनाऱ्या लगतच्या परिसरात त्सुनामी धोका उद्भवण्याची शक्यता आहे. करिता उत्तन व खाडी लगतच्या लोकांना त्सुनामीचे धोका ओळखण्याचे व त्यावर करावयाची उपाययोजना यावर प्रशिक्षण देण्यात येते.

८) <u>भूकंप :-</u> ठाणे जिल्हा हा भूकंपाच्या झोन ३ मध्ये मोडतो. याचे प्रामुख्याने कारण म्हणजे ठाणे खाडी व पनवेल मधील असलेली खाडी, धरणतर खाडी या खाडया खालून च्ृद्वथ्द्य थ्त्दङ्ग गेलेली असल्याने ठाणे जिल्हा हा भूकंपाच्या झोन ३ मध्ये मोडतो.

९) <u>दरड कोसळणे :-</u> मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील काशीगाव या ठिकाणी डोंगराळ भाग असल्याने दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता तेथील नागरीकांना आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत व स्थलांतरीत करण्यासाठी कार्यवाही प्रस्तावित आहे.

१०) <u>ईमारत कोसळणे :-</u> दुर्दैवाने एखादी धोकादायक इमारत कोसळल्यास, अग्निशमन विभागाच्या मदतीने इमारतील रहिवाशानाबाहेर काढून मनपाच्या एकूण ३५ शाळांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

११) <u>साथरोग :-</u> पावसाळया दरम्यान साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी खालील प्रमाणे खबरदारी घेऊन महापालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

- पिण्याचे पाणी पंधरा मिनीटे उकळून व गाळून घ्यावे.
- शिळे अन्न, सडलेली फळे तसेच उघडयावरचे अन्नपदार्थ खाऊ नयेत.
- भाज्या, फळे इत्यादी स्वच्छ धुवून मगच खाण्यासाठी वापरावी. तसेच अन्नपदार्थ नेहमी झाकून ठेवावेत.
- अतिसाराच्या रूग्णावर क्षार संजीवनी मिश्रणाचा त्वरित वापर करावा. सदर मिश्रण नजिकच्या आरोग्य केंद्रात उपलब्ध आहे.
- आवश्यकतेनुसार घरगुती पाणी शुध्दीकरणासाठी क्लोरीनचा वापर करावा.
- आपल्या इमारतीमधील खालची व गच्चीवरील पाण्याची टाकी साफ व निर्जंतुक करून घ्यावी.
- आपल्या घरात किंवा शेजारी साथीच्या रोगाचा रूग्ण असल्यास नजिकच्या आरोग्य केंद्रास माहिती द्यावी.

- डासांची उत्पती टाळण्यासाठी घरातील पाण्याची भांडी रोजच्या दर आठ दिवसांनी रिकामी करून घासून धुऊन कोरडी करून मग भरण्यात यावी. सेप्टीक टँकच्या व्हेन्ट पाईपला जाळयाबसविणे.
- कुठलाही ताप हिवताप असू शकतो याकरिता ताप आल्यावर त्वरित नजिकच्या महापालिका आरोग्य केंद्रात औषधोपचार व रक्त तपासणी करून घ्यावी.


शहरामध्ये साथ रोग पसरू नये याकामी साथरोगाची लक्षणे व नागरिकांनी घ्यावयाची दक्षता याबाबत खालीलप्रमाणे नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

- मिरा भाईंदर महापालिकेच्या परिवहनबसेसवर डेंग्यू संदर्भात माहिती प्रदशिर्त केली आहे.
- डेंग्यू, चिकुनगुन्या संदर्भात घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दर्शविणारी होडीर्ंग्ज् सर्व शहरभर लावण्यात आलेली आहेत.
- स्थानिक केबल टी.वी. द्वारे सर्व नागरिकांना डेंग्यू संदर्भात घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दाखविण्यात येत आहेत.
- सर्व स्थानिक वर्तमान पत्रातून जाहिरात देउन डेंग्यू संदर्भात जनजागृती करण्यात येत आहे.
- मिरा भाईंदर शहरातील महत्वाच्या हॉस्पीटलच्या डॉक्टरांबरोबरबैठका घेऊन डेंग्यू, चिकुनगुन्याचा कसा मुकाबला करता येईल. यासंदर्भात चर्चा व माहितीची देवाणघेवाण करण्यात आली.
- सर्व सोसायट्यांना पाण्याच्या टाक्यांची झाकणे व्यवस्थित असण्याबाबत तसेच सोसायट्यांच्या आवारात रिकामे डब्बे, फुटक्याबाटल्या, शहाळी, टायर्स इ. अडगळीच्या वस्तु साठणार नाहीत याबाबत खबरदारी घेण्यास सांगितले आहे.
- सर्व खाजगी दवाखान्यांना पत्र पाठवून डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस, चिकुनगुन्या या आजारांच्या रुग्णांची माहिती तात्काळ महापालिकेच्या आरोग्य विभागास देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- डेंग्यू संदर्भातील पोस्टर्स वबॅनर्सची छपाई करून ती सर्वत्र प्रदशिर्त करण्यात आली आहेत.
- गप्पी मासे हे डासांच्या अळ्या खाऊन जगतात. हे मासे विहिरी, तलाव, डबकी इ. ठिकाणी सोडण्यात येतात.

<u>प्राधिकरणाच्या संरचनेचा तक्ता</u>

(वशवृक्षाचा तक्ता जसा असतो तसा तक्ता प्रत्येक पातळीवर कार्यकक्षा व संपर्काच्या पत्याशी त्याची जोड घालून दाखवावी.)

## पदानुक्रम



## कलम ६० - अ (२) (अ)

मिरा भाईदर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग येथील कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशीत करणे.

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीची उद्दीष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | |

## कलम ६० - अ (२) (ब)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयांच्या अधिसभांची यादी प्रकाशीत करणे.

| अ. क्र. | अधिसभेचे नांव | सभेचे सदस्य | सभेचे उद्दीष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | |

## कलम ६० - अ (२) (क)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयाच्या परिषदांची यादी प्रकाशीत करणे.

| अ. क्र. | परिषदेचे नांव | परिषदेचे सदस्य | परिषदेचे उद्दीष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | |

## कलम ६० - अ (२) (ड)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयाच्या कोणत्याही संस्थेची यादी प्रकाशीत करणे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचे सदस्य | संस्थेचे उद्दीष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | |

## कलम ६० - अ (३)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | पदनाम | कर्मचारी वर्ग | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. मारुती गायकवाड | उप-आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन) | 01 | |
| 2. | श्रीम. मनस्वी म्हात्रे | विभाग प्रमुख | 03 | |

## कलम ६० - अ (४)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील मिळणाऱ्या/ सवलतीचा परवाना याची चालु वर्षाची तपशीलवार माहिती परवाना/परवानगी/ सवलतीचे प्रकार :-

| अ. क्र. | परवाना धारकाचे नांव | परवान्याचा प्रकार | परवाना क्रमांक | दिनांका पासुन | दिनांका पर्यंत | साधारण अटी | परवान्याची विस्तृत माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| निरंक | | | | | | | |

## कलम ६० - अ (५)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयाचे मंजुर अदांजपत्रक व खर्चाचा तपशील याची विस्तृत माहिती प्रकाशीत करणे.

| अ.क्र. | अंदाजपत्रकिय शिर्षक (सन 2022-23) | लेखाशिर्ष कोड | मंजुर रक्कम (तरतुद) (रु. लाखांत) |
|---|---|---|---|
| 1) | नैसर्गिक आपत्तीजनक परिस्थितीमध्ये मार्गदर्शन/ प्रशिक्षण/ व्यवस्थापन साहित्य खरेदी/ इतर व्यवस्था | 4150 | 75.00 |
| 2) | आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी<br>अ) Covid-19 मनपा हिस्सा/ शासन अनुदान<br>ब) Covid-19 अंतर्गत कोरोनाची लागण होउन मृत्युमुखी पडलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र/ राज्य शासन अंतर्गत सानुग्रह सहय्यक अनुदान | 3290 | 1600.00<br>5.00 |

## कलम ६० - अ (६) (अ)

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामाशी संबंधीत नियम/ अधिनियम

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005

## कलम ६० - अ (६) (ब)

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामाशी संबंधीत शासन निर्णय

**-- निरंक --**

## कलम ६० - अ (६) (क)

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामाशी संबंधीत शासन परिपत्रके

**-- निरंक --**

## कलम ६० - अ (६) (ड)

आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामाशी संबंधीत कार्यालयीन आदेश/ धोरणात्मक परिपत्रके

| अ.क्र. | विषय | क्रमांक व तारीख | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## कलम ६० - अ (६) (ड़)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयामध्ये उपलब्ध् दस्ताऐवजींची यादी

------------ **निरंक** -----------

## कलम ६० - अ (७)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील सर्व योजनांचे तपशिल, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्च आणि सवितरित केलेल्या रकामांबाबतचा अहवाल.

(सन 2022-23)

(रूपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | तरतुद | खर्च |
|---|---|---|---|
| १. | नैसर्गिक आपत्तीजनक परिस्थितीमध्ये मार्गदर्शन/ प्रशिक्षण/ व्यवस्थापन साहित्य खरेदी/ इतर व्यवस्था | 75.00 | 00.00 |
| २. | आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी<br>अ) Covid-19 मनपा हिस्सा/ शासन अनुदान | 1600.00 | 917.73 |
| | ब) Covid-19 अंतर्गत कोरोनाची लागण होउुन मृत्युमुखी पडलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र/ राज्य शासन अंतर्गत सानुग्रह सहय्यक अनुदान | 5.00 | 0.00 |

## कलम ६० - अ (८) नमुना (अ)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती

---------- **निरंक** ----------

## कलम ६० - अ (८) नमुना (ब)

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयातील अनुदान कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थींची विस्तृत माहिति प्रकाशीत करणे.

योजना/ कार्यक्रमाचे नांव :-

| अ. क्र. | लाभार्थीचे नांव व पत्ता | अनुदान/लाभ याची रक्कम/स्वरुप | निवड पात्रतेचे निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| -- **निरंक** -- | | | | |

## कलम ६० - अ (९)

**महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत् योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशिल**

---------- **निरंक** ----------

## कलम ६० - अ (१०)

**राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यांबाबतची माहिती.**

---------- **निरंक** ----------

## कलम ६० - अ (११)

**महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींव्दारे मिळालेले उत्पन्न :-**

| | | |
|---|---|---|
| (अ) | कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी | लागु नाही |
| (ब) | वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामगची कारणे | लागु नाही |
| (क) | राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने | लागु नाही |
| (ड) | महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबाजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरुप आणि विनियोगाची मर्यादा | लागु नाही |
| (इ) | जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा. | लागु नाही |

## कलम ६० - अ (१२)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागातील नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद

| अ. क्र. | लेखाशिर्ष | लेखा संकेतांक | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | सन २०२२-२३ चे सुधारित अंदाज | | | सन २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १-४-२०२२ ते ३०-११-२०२२ | १-१२-२०२२ ते ३१-३-२०२३ | २०२२-२३ एकुण | आयुक्त तथा प्रशासक यांचे मूळ अंदाज |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | आपत्ती व्यस्थापन साहित्य खरेदी / इतर व्यवस्था | 4150 | ०.०० | ०.०० | १.४३ | ०.०० | ७५.०० | ७५.०० | ५०.०० |
| २ | आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था निधी | 3290 | ७.०० | | | | | | |
| | अ) Covid-19 मनपा हिस्सा/ शासन अनुदान | | ०.०० | ८५७४.८६ | ७८७२.३४ | ९१७.७३ | ६८२.२७ | १६००.०० | ५००.०० |
| | ब) Covid-19 अंतर्गत कोरोनाची लागण होउुन मृत्युमुखी पडलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र/ राज्य शासन अंतर्गत सानुग्रह सहय्यक अनुदान | | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ५.०० | ५.०० | १००.०० |

<u>कलम ६० - अ (१३)</u>

विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.

मिरा भाईंदर महानगरपालिका येथील आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यालयाच्या परिणामकारक कामांसाठी जनसामान्यांशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था.

**----------- निरंक -----------**

••••••

सहा. आयुक्त
आपत्ती व्यवस्थापन विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका